महाज्योती-भाऊ इन्क्युबेशन प्रोग्राम

महाज्योती आणि COEP's Bhau Institute of Innovation, Entrepreneurship & Leadership, Pune यांच्या संयुक्त विद्यमाने

१. कार्यक्रमाबद्दल

- महाज्योती-भाऊ इन्क्युबेशन प्रोग्राम हा महाराष्ट्रातील OBC, VJ, NT आणि SBC प्रवर्गातील नॉन-क्रिमी लेयर प्रमाणपत्रधारक, नाविन्यपूर्ण व्यवसाय व तंत्रज्ञान आधारित कल्पना असलेल्या नवउद्योजकांसाठी राबविण्यात येत आहे.
- या कार्यक्रमाचा उद्देश नाविन्यपूर्ण कल्पनांचे प्रारूप (Prototype) विकसित करून त्यांचे स्टार्टअपमध्ये रूपांतर करण्यासाठी महाज्योती यांच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे तसेच COEP's Bhau Institute मार्फत तज्ज्ञ मार्गदर्शन व इन्क्युबेशन सहाय्य प्रदान करणे हा आहे.
- **उद्योग उभारणीसाठी संभाव्य क्षेत्र :** IoT and AI/ML, Agritech Solutions, Food Tech, EdTech, HealthTech , Renewable Energy, Electric Vehicles (EV) & Smart Mobility, Cyber Security, Grassroot Level Innovations, and Sustainable Innovations.

२. पात्रता निकष

अर्जदाराने खालील अटी पूर्ण केलेल्या असाव्यात.

- अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
- अर्जदार हा OBC, VJ, NT किंवा SBC प्रवर्गातील **नॉन-क्रिमी लेयर** गटातील असावा.
- अर्जदाराकडे अर्जदाराकडे महाराष्ट्र रहिवासी दाखला, OBC, VJ, NT आणि SBC प्रवर्गातील जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र आणि नॉन-क्रिमी लेयर प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे
- अर्जदाराकडे स्वतःची नाविन्यपूर्ण व्यवसाय व तंत्रज्ञान आधारित कल्पना असावी.
- कार्यक्रमासाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे **महाज्योती** आणि COEP's Bhau Institute यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे.

३. कार्यक्रमाचा कालावधी व जबाबदाऱ्या

- निवड झालेल्या लाभार्थ्याने **एक वर्षाच्या आत** आपल्या कल्पनेचे प्रारूप (Prototype) विकसित करून त्याचे **स्टार्टअपमध्ये रूपांतर** करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.
- कार्यक्रमाच्या कालावधीत लाभार्थ्याने आपल्या स्टार्टअपवर **पूर्णवेळ** (Full-time) काम करणे अपेक्षित आहे.
- कार्यक्रमाच्या कालावधीत महाज्योतीच्या इतर कोणत्याही आर्थिक सहाय्य योजनेचा लाभ घेता येणार नाही.

- लाभार्थ्याने COEP's Bhau Institute मार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या मेंटरशिप, मार्गदर्शन सत्रे आणि मूल्यांकन (Evaluation) प्रक्रियेमध्ये नियमितपणे सहभाग घेणे बंधनकारक राहील
- लाभार्थ्याने वेळोवेळी **प्रगती अहवाल** (Progress Report) भाऊ इन्स्टिट्यूटकडे सादर करणे बंधनकारक राहील.

४. अर्ज प्रक्रिया

- अर्जदारांनी **महाज्योती** व COEP's Bhau Institute यांच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करावा.
- प्राप्त अर्जांमधून जास्तीत जास्त १० नवउद्योजकांची या प्रोग्रामसाठी निवड करण्यात येईल.
- निवड झालेल्या सर्व लाभार्थ्यांना COEP's Bhau Institute मार्फत पुढील १२ महिन्यांसाठी इन्क्युबेशन सहाय्य, तज्ज्ञ मार्गदर्शन, तसेच व्यवसाय विकासासाठी सहाय्य प्रदान करण्यात येईल.

५. आर्थिक सहाय्य

- निवड झालेल्या लाभार्थ्यांना प्रारूप (Prototype) **व स्टार्टअप विकासासाठी** त्यांच्या प्रगती अहवालाच्या आधारे आणि COEP's Bhau Institute च्या शिफारशीनुसार **प्रतिमाह** ₹२५,०००/- इतके अर्थसहाय्य **कमाल एक वर्षासाठी** देण्यात येईल.

६. आपण खाली दिलेल्या लिंकवर क्लिक करून आपला अर्ज भरू शकता.
अर्ज नोंदणीसाठी लिंक: **https://forms.gle/9H26Aa3HkJZTo5WJ6**

अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख : २० जुलै २०२६

सूचना

- अर्जामध्ये दिलेली सर्व माहिती सत्य व अचूक असावी.
- आवश्यक कागदपत्रे अपूर्ण असल्यास अर्ज विचारात घेतला जाणार नाही.
- कार्यक्रमासंदर्भातील सर्व सूचना अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्या जातील.

महाज्योती
ज्ञानदीप समतेचा

BHAU INSTITUTE

# MAHAJYOTI-BHAU




## INCUBATION PROGRAMME

### ABOUT THE PROGRAMME

MAHAJYOTI-BHAU Incubation Program for selected innovators with promising and innovative ideas from target groups under MAHAJYOTI in the state of Maharashtra. The Innovator must be a resident of Maharashtra State and shall belong to the Non-Creamy Layer group of OBC, VJ, NT and SBC categories.

**For more information**

020 25507023
manager.bhau@coeptech.ac.in
bhau.org

**SCAN TO REGESTER**